**Adishakti Dhandai Mata Shikshan Prasarak Sanstha's**

**Late Annasaheb R.D.Deore Arts and Science College, Mhasadi**

Tal-Sakri, Dist-Dhule (M.S)424304

**NAAC- B Grade (CGPA-2.41)**

# विदयार्थी विकास विभाग

## शैक्षणिक वर्ष 2019-2020 चा वार्षिक अहवाल

**कबचौ,उ.म.विदयापीठ** अंतर्गत विदयार्थी **विकास** विभागामार्फत राबविण्यात येणा-या व **स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालयाने** सहभाग घेतलेल्या विविध उपक्रमांचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष **2019-2020** मधील विदयार्थी विकास विभागाची प्रथम सभा मा.प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली **दि.25/06/2019** रोजी घेण्यात आली. सभेत मागील शैक्षणिक वर्षाचा कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच मागिल वर्षी विभागा मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांचा यशस्वीतेबाबत समाधान व्यक्त् करुन नुतन शैक्षणिक वर्ष असेच उपक्रम राबवावेत असे मत व्यक्त् करण्यात आले. तसेच विदयार्थी हित लक्षात घेता विदयापीठा मार्फत गरीब होतकरु विदयार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांचे अर्ज मागविण्याचे परवानगी देण्यात आली. त्याच प्रमाणे विदयापीठ स्तरीय विविध कार्यशाळा, अविष्कार,युवारंग इ.सारख्या उपक्रमात जास्तीत जास्त् विदयार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा कला गुणांना वाव मिळावा असे ठरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष **2019-2020** मध्ये विदयार्थी कल्याण विभागा मार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

1- कमवा व शिका महाविदयालयात गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या कमवा व शिका योजने साठी विदयापीठ परीपत्रकानुसार आठ विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यास मा.प्राचार्यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करुन विदयापीठाकडे पाठविण्यात आला. या उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांनी महाविदयालय परीसरात बाबकाम ,रोपलागवड,झाडांना पाणी देणे ,परीसर स्वच्छता ,ग्रथालयीन कामे ,विज्ञान विभागातील प्रयोगशाळा स्वच्छता,कार्यालयीन उपयुक्त् कामे इ.कामकाज केले.त्यांचा कामाचा मेहनाताना म्हणुन **163200/-** रुपये विदयार्थ्यांच्या खात्यावर टाकण्यात आले.

2- आर्थिक दुर्बल घटक विदयापीठामार्फत अपंग,अनाथ,गरीब विदयार्थ्यांसाठी देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी महाविदयालयातील **13** विदयार्थ्यांची निवड करण्यात येवुन तसा प्रस्ताव विदयापीठ विदयार्थी कल्याण विभागात पाठविण्यात आला. या योजनेखाली 13 विदयार्थ्यांना विदयापीठाकडुन **57,000/-** रुपये मंजुर झाले होते.

3- **आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा** -शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विदयापीठ परीपत्रकानुसार महाविदयालयाने 02 कार्यशाळा आयोजनासाठीचे प्रस्ताव विदयापीठाकडे सादर केले . त्यात तीनदिवशीय मैत्री शिबिर व युवतीसभे अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा यांचा आयोजनास विदयापीठाने परवानगी दिली .

**युवतीसभा- शुक्रवार दि. 13 जानेवारी 2020** रोजी महाविदयालयात युवती सभा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत सात महाविदयालयाच्या 52 विदयार्थीनीं सहभागी झाल्या त्यात सि.गो.पाटील महाविदयालय साक्री, विमलबाई महाविदयालय,साक्री, उत्तमराव पाटील महाविदयालय दहिवेल, एनएनसी महाविदयालय, कुसुंबा, आदर्श महाविदयालय, निजामपुर, कर्मवीर अ.मा.पाटील महाविदयालय, पिंपळनेर, व म्हसदी महाविदयालयाच्या विदयार्थीनींचा सहभाग होता. या कार्यशाळेत **04** व्याख्यात्यांनी विदयार्थीनीना अनमोल असे मार्गदर्शन केले.

**तीनदिवशीय मैत्री शिबिर** - दि.20/08/2019 ते दि.22/08/2019 दरम्यान विदयार्थी विकास विभाग कबचौ .उ.म.विदयापीठ जळगांव पुरस्कृत व स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी आयोजित तीनदिवशीय मैत्री कार्यशाळा आमच्या महाविदयालयात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत धुळे, जळगाव व नंदुरबार या तिन्ही जिल्हातील वेगवेगळ्या महाविदयालयातुन एकुण 161 विदयार्थ्यांनी व 10 संयोजन समिती सदस्य असे एकुण 171 जणांनी उत्साहपुर्वक सहभाग नोंदवला.

या तीनदिवशीय मैत्री कार्यशाळेचे उदघाटन दि.20/08/2019 रोजी सकाळी ठिक 10.00 वाजता मा.प्रा.डॉ.मोहन पावरा(व्यस्थापन परिषद सदस्य, कबचौ.उमवि, जळगाव)यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.दादासो.संजयकुमार आर देवरे हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मा.भाऊसो.हिम्मतराव देवरे(अध्यक्ष-धनदाई तरूण ऐक्यमंडळ म्हसदी) तसेच

प्रमुख उपस्थिती म्हणुन संस्थेचे खजिनदार मा.डॉ.ताईसो.सुजाता सुनिल देवरे व महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील होते.

4- **विविध उपक्रमात सहभाग-** विदयापीठ पुरस्कृत व विदयार्थी कल्याण विभाग आयोजित विविध महाविदयालयातील कार्यशाळामध्ये महाविदयालयातील विदयार्थ्यांचा सहभाग मोठया प्रमाणात होता. या कार्यशाळांसाठी महाविदयालयाने **रु.28600/-** प्रवास खर्च केला. त्यात युवारंग, अविष्कार, युवतीसभा, साहस कार्यशाळा, जागतिक तापमानवाढ कार्यशाळा, मैत्री कार्यशाळा, पोवाडा गायनकार्यशाळा, आपतकालीन कार्यशाळा इ. कार्यशाळांमध्ये विदयार्थी सहभागी झाले त्याचा आलेख पुढील प्रमाणे आहे.

5-

## विविध कार्यशाळेत सहभागी विदयार्थी संख्या

| **अ.क्र** | **उपक्रम** | **विदयार्थी संख्या** | **ठिकाण** |
|---|---|---|---|
| 01 | युवारंग | 11 | विद्यार्थी विकास विभाग क.ब.चौ उमवि जळगाव |
| 02 | अविष्कार | 06 | सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री |
| 03 | युवती सभा-3 | 29 | पिंपळनेर,म्हसदी,निजामपुर,कुसुबा,साक्री |
| 04 | श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा | 05 | कला,शास्त्र व वाणिज्य महा.चोपडा |
| 05 | आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळा | 05 | सि.गो.पाटील महाविद्यालय साक्री |
| 06 | पहिले विद्यार्थी साहित्य संम्मेलन | 04 | विद्यार्थी विकास विभाग क.ब.चौ उमवि मु.जे. महाविद्यालय जळगाव |
| 07 | एकदिवसीय नाट्य कौशल्य कार्यशाळा | 04 | `विमलबाई महाविद्यालय साक्री |
| 08 | आंतर महाविद्यालय | -- दोन | विद्यार्थी विकास विभाग क.ब.चौ उमवि जळगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | नियतकालिका अंक स्पर्धा | पारितोषिक | |
| 09 | एक दिवसीय साहित्य कला कार्यशाळा | 04 | जिजामाता महाविद्यालय नंदुरबार |
| 10 | वाय एस महाजन मुलींची वक्तृत्वस्पर्धा | 02 | आर.सी.पटेल महा.शिरपुर |
| | एकुण | 70 | |

## आयोजित कार्यशाळा

| **अ.क्र** | **उपक्रम** | **विदयार्थी संख्या** | **कालावधी** |
|---|---|---|---|
| 01 | युवतीसभे अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तीमत्व् विकास कार्यशाळा | 52 | 13/01/2020 |
| 03 | मैत्री कार्यशाळा | 171 | 20/08/2019 ते 22/08/2019 |
| | एकुण | 223 | |

विदयार्थी विकास विभागाच्या अशा विविध उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी विविध महाविदयालयात तज्ञ प्राध्यापकाबरोबरच संस्थेचे अध्यक्ष मा.दादासो.डॉ.संजयकुमार आर.देवरे ,सचिव मा.ताईसो.डॉ.संजिवनी संजय देवरे,संचालक मंडळ, धनदाई तरुण ऐक्यमंडळ ,संयोजन समिती सदस्य,प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विदयार्थी इ.अनमोल मार्गदर्शन सहकार्य मोठया प्रमाणाल लाभले. त्यामुळे विदयापीठाने दाखविलेला विश्वास महाविदयालयाने यशस्वी केला .

डॉ.शिंदे विशाल नारायण
विद्यार्थी विकास अधिकारी

प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील